RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# मराठी कवितेची वाटचाल व १९९० नंतरची आदिवासी कविता

**डॉ. पांडुरंग भोसले**
प्रमुख, मराठी विभाग,
महात्मा फुले महाविद्यालय,
पिंपरी, पुणे - १७.

**प्रास्ताविक :**

संत वाङ्मय, पंडिती काव्य, शाहिरी परंपरा यामधून आधुनिक पूर्व कालखंडातील मराठी कवितेची वाटचाल नवयुगाच्या द्वाराशी आलेली दिसते. वरील सर्व साहित्यप्रवाहांचा एक धागा यात संमिलित झालेला दिसतो. आधुनिक काळातील इंग्रजांच्या सान्निध्यामुळे काव्यपरंपरेलाही एक नवे परिमाण लाभले. एकूणच साहित्य कालप्रवाहाबरोबर नवनवीन दिशांनी विकसित होत राहिले. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही रूपांनी आपला कायापालट करीत वाढलेले दिसते.

या काव्यविकसनाचा वेध घेत असता विविध संप्रदाय, भावकाव्य, अनुकरण, सामाजिकता, प्रादेशिकता, राष्ट्रीयता, वस्तुनिष्ठता, आत्मनिष्ठता, निसर्ग-प्रेम-ईश्वर-गूढगुंजन-काव्यविषयक जाणिवा, विचारप्रधानता, बोधप्रधानता,प्रचारात्मकता, तत्त्वचिंतन, जीवनचिंतन, सुधारणा, क्रांतिकारकत्व, स्वप्ने, परिवर्तनशीलता, तत्त्वमीमांसा, श्रद्धास्थाने, विनोदभयता, जुन्याची ओढ-नव्याचे आकर्षण, कल्पकता, नाविन्याची हौस-स्वीकारशीलता अशा विविध गुणयुक्त परंपरांचा आणि नाविन्यपूर्णतेबरोबरच छंद, आलंकारिकता, शैली, लय या अनुषंगानेही कवितेचा विचार करता येईल. परंपरेची ओढ आणि नाविन्याची ऊर्मी या दोन्हींचा सतत संघर्ष सुरू असतो. या संघर्षातूनच नवनव्या परंपरा वा संप्रदाय निर्माण होत असतात.

पंडिती वळणाची व केशवसुती वळणाची कविता हे दोन मुख्य प्रवाह :

१८८५ च्या दरम्यान केशवसुतांनी आधुनिक मराठी कवितेचा पाया घातला. त्यांनी काव्यप्रांतात घडवून आणलेले आंतर्बाह्य बदल पुढीलांना स्फूर्तिदायक ठरले. चंद्रशेखर यांनी पंडिती काव्याची परंपरा सर्वसामर्थ्यानिशी पुढे चालवून आपला ठसा कायम ठेवला.

विठ्ठल भगवंत लेंभे यांनीही जुन्या परंपरेचे वळण गिरविले. संस्कृत काव्याचे संस्कार त्यांच्यावर अधिक प्रबळ असल्याचे दिसते. विषयाची मांडणी, रचनावैशिष्ट्ये आणि भाषाशैली या सर्व बाबतीत ते संस्कृत परंपरा पुढे चालवताना दिसतात. 'सुरतरंगिणी' हे त्यांचे दीर्घ काव्य - महाकाव्यसदृश अशीच ही रचना आहे. कृष्णाजी नारायण आठल्ये, गंगाधर रामचंद्र मोगरे, वासुदेव वामनशास्त्री खरे, विद्याधर वामन भिडे, लक्ष्मण गणेशशास्त्री लेले, बाळकृष्ण अनंत भिडे, अनंततनय (दत्तात्रेय अनंत आपटे) राधारमण (कृष्णाजी पांडुरंग लिमये), साधुदास (गोपाळ गोविंद पाटणकर) असे काही कवी पंडिती परंपरा काही प्रमाणात पुढे चालविताना दिसतात.

**केशवसुत संप्रदायाचे योगदान**

१८८५ ते १९२० या कालखंडातील नव्याने काव्यप्रांतात आलेल्या रोमँटिक प्रवृत्तीचे दर्शन केशवसुतांच्या कवितेने घडविले. इंग्रजी वळणाच्या त्या परंपरेच्या नवख्या अविष्काराचा प्रभाव केशवसुतांच्या काव्यावर पडला. साहिजकच नव्याचा स्वीकार करण्याच्या प्रवृत्तीतून तो केशवसुतांच्या नंतरच्या पिढीवरही पडला.

अर्वाचीन मराठी काव्यात जे नवनवे विशेष आढळले, त्यात समाजविषयक जाणिवा व्यक्त करणे हा एक सांगता येईल. त्या कालखंडातील सामाजिक, राजकीय परिस्थिती आणि इंग्रजी वाङ्मय याची ओळख यामुळे सर्व जीवनच ढवळून निघाले होते. माधवानुज, रेंदाळकर, बालकवी, रेव्ह. टिळक, बी. विनायक, गोविंदाग्रज यांच्या काव्यावर सामाजिकतेचा कमी अधिक परिणाम झाला.

मराठी काव्यपरंपरेत प्रेमविषय नवीन नव्हता. मात्र पूर्वीचे राधा-कृष्ण यांच्या रूपातून व्यक्त होणारे प्रेम वैयक्तिक पातळीवर आले. प्रणयभावना ही निःसंकोचपणे आत्मनिष्ठ पातळीवर केशवसुतांच्या कवितेत उतरली. पुढीलांवर त्याचा परिणाम झाला. त्यांनी प्रेमाची विविध रूपे रेखाटली. दत्त, बालकवी बी, चंद्रशेखर, माधवानुज, रेंदाळकर, गोविंदाग्रज यांनी प्रेमाची विविध रूपे मांडली.

आशयदृष्ट्या जसे या कालखंडातील काव्याचे स्वरूप बदलले, तसेच आकार आणि अभिव्यक्तीदृष्टयाही काव्यात विविध अंगांनी बदल झाले. संस्कृत परंपरेकडून आलेली अक्षरगणवृत्ते काही प्रमाणात राहिली, तर अनेक नवी मात्रावृत्ते, छंदही या काळात रूढ झाले. साकी, फटका, हरिभगिनी, नववधू, अंजनीगीत, दोहा, उद्धव अशी विविध मात्रावृत्ते या काळात रूढ झाली. इंग्रजी वाङ्मयाच्या प्रभावातून आलेली 'सुनीत' सारखी रचनाही या काळात पुढे चालू राहिली. संस्कृतप्रचुर प्रौढ, क्लिष्ट, समासयुक्त रचनेपेक्षा अधिक सोपी, साधी, सरळ, प्रसादयुक्त झाली.

एकंदरीत या कालखंडातील केशवसुत संप्रदायी काव्याचा विचार करता - ''ज्याला केशवसुत संप्रदाय म्हणतात तो वाङ्मयीन वादाच्या दृष्टीने मराठी कवितेत रोमँटिसिझम म्हणजे स्वच्छंतावाद होय. विषया-आशयाची नवीनता व प्रकार पद्धतींची नवता हा या स्वच्छंदतावादाचाच पुरावा होय. क्रांतिकारी विद्रोह, सौंदर्यपूजन, व्यक्तिस्वातंत्र्य, निसर्गप्रेम, प्रणयप्रेम, आदर्शवाद, दिव्यध्यास, आत्मनिष्ठा, स्वैरपणा, भावोत्कटता, गूढरम्यता, उदासीनता व हुरहूर यासारख्या वृत्तींनी भरलेल्या स्वच्छंदतावादाची अनेक रूपे या काळातील कवींच्या कृतींमधून प्रत्ययाला येतात.'' हे

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

निशिकांत ठकार यांचे या काळाचे मूल्यमापन यथोचित असेच आहे.

रविकिरण मंडळातील माधव ज्यूलियन, गिरीश, श्री. बा. रानडे, सौ. मनोरमाबाई रानडे, ग.त्र्यं. माडखोलकर, द.ल. गोखले या सभासदांनी केशवसुतांची परंपरा पुढे चालविली. भावगीतांबरोबरच दीर्घकाव्य, खंडकाव्य, गझल, स्फुटकाव्य अशी वैशिष्टयपूर्ण रचना त्यांनी केली. कवी यशवंतांनी ‘जयमंगला’ ‘बंदिशाला’, ‘काव्यकिरीट’ इ. खंडकाव्ये लिहून समाजातील कारूण्यमयता रेखाटली. पुढे बा.भ. बोरकरांनी गोमंतकीय जीवन आणि निसर्गसौंदर्याची विविध रूपे रेखाटली. ‘दुधसागर’, ‘जीवनसंगीत’, ‘आनंदभैरवी’ या काव्यसंग्रहाचा यात आवर्जून उल्लेख करावा लागेल. कुसुमाग्रजांच्या ‘विशाखा’ आणि इतर काव्यसंग्रहांनी क्रांतिमार्गाबरोबरच मानवतेचा उपासक म्हणून काव्यप्रांत उजळून काढला.

**नवकाव्य**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर सौंदर्यवादी काव्यप्रवाहाला आशय आणि अभिव्यक्तीदृष्टया नवे वळण बा. सी. मर्ढेकरांनी लावले. या प्रवाहात शरच्चंद्र मुक्तिबोध, वसंत हजरनीस, य.द. भावे, विं. दा. करंदीकर, गं.ब. ग्रामोपाध्ये, सदानंद रेगे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. भांडवलशाही अर्थव्यवस्था, त्यावर जगणारा असा कलावंतांचा वर्ग भांडवलशाहीचा ऱ्हास पहात होता. सगळीकडे आलेली दांभिकता, अनीती, अज्ञान, संस्कृतीचा नाश, अज्ञान, लैंगिक स्वैराचार या गोष्टी कवींना आवाहक ठरल्या. दुसऱ्या महायुध्दामुळे विस्कटलेली समाजघडी व मानवतेची मुस्कटदाबी कवींचे लक्ष वेधणारी ठरली. माणूस हा यंत्रवत झाला. किंबहुना तो यंत्राचा दास झाला. त्याचे प्रत्यंतर मर्ढेकर, हजरनीस यांच्या कवितेत येते. यांच्या कवितेतून काहीसा निराशावादी सूर उमटताना दिसतो, तर आजची दैन्यावस्था, व्यथा-विवंचना यांचा नाश जनशक्तीच्या रेटयामुळे होईल असा आशावाद शरच्चंद्र मुक्तिबोध, सदानंद रेगे, पु.शि. रेगे, विं.दा. करंदीकर, अरूण कोल्हटकर यांच्या कवितेत दिसतो. अर्थात हे नवकवी आणि त्यांची कविता भावनाप्रधानतेपेक्षा विचार प्राधान्याला महत्त्व देताना दिसते. काही अंशी बेचव, प्रेरणाशून्य, अर्थशून्य, ओंगळ, अश्लील, अनीतिकारक, विकृत अशी टिका त्यांच्यावर झाली. पण मराठी काव्याच्या प्रांतात खळबळ माजवून नवकवितेने नवा प्रवाह सुरू केला याकडे दुर्लक्ष करता येत नाही.

वरील काव्यप्रवाहांचा विचार करता ग्रामीण कविता, दलित कविता, स्त्रीवादी कविता, आदिवासी कविता असे बदलत्या काल प्रवाहाबरोबर विविध प्रवाह यात संमिलित होताना आढळतात. खेडे आणि शहर यांना केंद्रवर्ती ठेवून आणि सभोवतालच्या बदलांचा वेध घेत, मानवी जीवनाची स्थित्यंतरे टिपत ही कविता आपापले भावविश्व टिपताना दिसते. मात्र यातील आदिवासी लोकमानस  पूर्णतः दुर्लक्षित असेच राहिलेले दिसते. बदलत्या कालप्रवाहात त्यांचे जगणे, त्यांच्या व्यथा-वेदना, विचार-विकार यांना वाचा फोडण्याचे आणि इतरांचे लक्ष वेधून घेण्याचे कार्य आणि त्यांच्या जगण्याचा स्वतंत्र प्रवाह काव्यप्रांतात आणून सोडण्याचे कार्य काही कवींनी केले.

आदिवासी काव्याचे दोन टप्पे पाडता येतील. १) १९४७ ते १९७५ २) १९७५ नंतरचे.

१९४७ म्हणजे स्वातंत्र्योत्तर काव्याचा विचार करता या काळात आदिवासींच्या विकासाला नुकतीच सुरूवात झाली होती. आदिवासी तरूण-तरूणी शिकायला लागले होते. स्वातंत्र्याच्या सुरूवातीच्या काळात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार फारसा न झाल्याने साहित्यनिर्मिती फारशी झालेली दिसत नाही. त्यात काव्य तर अगदीच अल्प. सर्वच पातळयांवरील पिडलेपण उपेक्षित जीवन वाटयाला आल्याने आणि व्यवस्थेचा जाच व त्याविरूद्ध संघर्ष करीत जीवन जगत असताना स्वतःचे अस्तित्व व जगण्याच्या प्रश्नापुढे साहित्यनिर्मिती गौण ठरल्याचेच हे निदर्शक आहे. तरीही मौखिक परंपरेने चालत आलेले लोकगीतांचे संचित महादेव गोपाळ कडू यांनी ‘आदिवासींची लोकगीते’ हे पुस्तक १९५७ ला प्रसिध्द केले. याच दरम्यान त्यांनी स्वतःचा ‘आदिवासींची गोड गाणी’ हा लोकगीतांचा संग्रहही १९८६ ला प्रकाशित केला. डॉ. गोविंद गारे व सुधीर जोग यांनी ‘आदिवासी लोकगीते’ हा लोकगीतांचा संग्रह १९८३ मध्ये संपादित केला.

१९७५ नंतरचा काळ खऱ्या अर्थाने आदिवासी साहित्याचा, त्यात काव्याचाही क्रांतिकाळ म्हणता येईल. आदिवासी कविता खऱ्या अर्थाने याच काळात निर्माण झाली. याला कारण तरूणांमध्ये वाढत गेलेली शिक्षणाची रूची हे आहे. जीवनजाणिवा विस्तारीत होत गेल्या. जीवनाच्या पडझडीचे आणि समाजजीवनाचे प्रतिबिंब काव्यात उमटू लागले. आपले जगणे मांडण्याबरोबरच आत्मोन्नतीचा आणि मुक्तीचा मार्ग आपला आपणच शोधला पाहिजे ही धारणाही त्या पाठीमागे असलेली दिसून येते. डोंगरदऱ्यात, कडयाकपारीत, वाडया-वस्त्यांवर संदर्भहीन जिणे जगणाऱ्या आदिवासींचे चित्र त्यांच्या दुःख-वेदना-विद्रोह-नकारांनी-अंधश्रद्धांनी-रूढी-परंपरांनी बंदिस्त जगणे शब्दबद्ध होऊ लागले. स्वतःची स्वतंत्र ओळख करून देण्याची ऊर्मीही त्यापाठीमागे असल्याचे जाणवते.

आदिवासी काव्यपरंपरेत डॉ. गोविंद गारे, वाहरू सोनवणे, डॉ. विनायक तुमराम, भुजंग मेश्राम, व्यंकटेश आत्राम, सुकदेवबाबुजी उइके, बाळ तिरानकर, डॉ. उत्तमराव धोंगडे, प्रा. माधव सरकुंडे, दशरथ मडावी, सुभाष आडे, सुरेश धनवे, प्रा. वामन शेळमाके, दामोदर इळपाते, गोविंद गायकी इत्यादी आदिवासींच्या पहिल्या पिढीतील कवींची नावे सांगता येतील. पुढच्या पिढीतील कवींमध्ये सौ. कुसुम अलाम, कविता आत्राम, पितांबर कोडापे, प्रब्रह्मानंद मडावी, कृष्णकुमार चांदेकर, गोपाळ आडे, सुनिल कुमरे अशी काही नावे सांगता येतील.

‘‘कधीकाळी सत्ताधारी संपन्न असणारी माणसे
कालौघात हीन-दीन झाली.’’

जल, जंगल आणि जमीन यावर सत्ता असणारे आदिवासी लोक पोरके झाले. सारसर्वस्व हिरावून गेले अशा स्थितीत त्यांचे जगणे मांडताना डॉ. गोविंद गारे ‘मूळ रहिवासी आदिवसी’ या कवितेत लिहितात,

‘‘जगतात ते
मरण येत नाही म्हणून

मरतात ते
जगता येत नाही म्हणून
कशाकरीता जगणे
कशाकरीता मरणे
यातला फरक
कोणी त्यांना सांगितला नाही''

वांझ नेतृत्वावर त्यांनी केलेला हा हल्ला खरोखरच अंतःकरण हेलावून सोडणारा आहे. (अनुभूती, १९९७, पृ. १६) एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावर विज्ञान-तंत्रज्ञानाच्या या युगात आणि समर्थ भारत बनण्याच्या आशा बाळगून असलेल्या या भारतातील एक जग अजूनही किती दूर आहे याची प्रचिती देताना उषाकिरण आत्राम 'जगापासून दूर-दूर' या कवितेत लिहितात,

''तो भटकतो उन्हापावसातून
काटया झुडपातून-दरी गुहेतून
जगापासून दूर--कोणती दिशा?
तो थांबला आहे जगाच्या कडेला
डोंगराच्या आडोशाला
वल्कलाने अब्रु झाकून
चिरूटाचा झुरका देत
तिरकमठा गुल्याल घेवून
झाडीतून-पानापानातून रोखून नजर
शोधीत इर्षेत पाखरं......''

आदिवासी लोकांचे जीवन म्हणजे जगण्यासाठीचा अविरत संघर्ष. सुधारणा झालेले जग त्यांच्यापासून कित्येक दशके दूर. असे असले तरी या जगातील लोकांचा वावर मात्र आदिवासी जगतात दिसून येतो. पिडलेल्या या जगातील स्त्रियांचे जगणे तर त्याहीपेक्षा अस्वस्थ करते. उषाकिरण आत्राम 'पयसाची लाल आग व्हय!' या कवितेत लिहितात,

राणे! एवढा शिणगार करू नगं.....
तुले शिणगार कायले पायजल?
...........................
वाटेनं-जातेस-तर समद्या डोयाले आग लागन
राणे! तुझ्यावर नजर समद्या सुधारलेल्या बाप्यायची
म्हणून म्हणते ''तू रातराणी होवू नगं''!
''व्हशील तं-पयसाची लाल -तांबडी आग व्हय''!
''नायत् - बिब्याची फुलं व्हय''!
(म्होरकी, १९९७, पृ. ११)

सर्वच पातळयांवर आदिवासी लोकांची फरपट प्रा. वामन शेळमाके यांना अधिक अस्वस्थ करते. खऱ्या अर्थाने संस्कृती जतन करण्याचे कार्य आदिवासी लोकांनीच केले.पण त्यांचे जगणे अस्थिर करणाऱ्या अशाही काही शक्ती कार्यरत असल्याचे सूचन कवी करून देतो. मात्र त्या सर्वांवर मात करण्याचे बळ आपल्यातच आहे, त्यासाठी आपलेच बांधव सोबतीला येत असल्याचा आशावाद प्रा. वामन शेळमाके 'मुक्तीचा संग्राम' या कवितेत मांडतात.

'दिसताहेत तुझ्या चेहऱ्यावर,
वेदनांच्या सुरकुत्या म्हणून
जन्मलास तू काटेरी पिंजऱ्यात
वाढलास गुलामीच्या काळोखात
पण तुला शपथ घेऊन सांगतो
मरू देणार नाही तुला मी
या वणव्याच्या पसाऱ्यात
येत आहेत आता वनवासी
तुझ्या मुक्तीचा संदर्भ घेऊन'
(जागवा मने पेटवा मशाली, १९९१, पृ. १३)

येथे आदिवासी मुक्तीसंग्रामाची नांदीच प्रतीत होते. हीच भूमिका त्यांच्या 'अरण्यातील निखारे' या कवितेतही येते. ते लिहितात,

**ISSN**
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

'आदिमा, इतिहास तुझा सत्य आहे
संघर्ष क्रांती हाच तुझ्या मुक्तीचा मार्ग आहे''
(जागवा मने पेटवा मशाली, पृ. ३८)

क्रांतिकारकांचा इतिहास मांडत असताना पूर्वसुरींमधील क्रांतीवीर नारायणसिंह उईके, राणी दुर्गावती यांचे संदर्भ देतात.

देशाला स्वातंत्र्य मिळाले तरी स्वातंत्र्याने आदिवासींच्या जगण्यात काहीच फरक पडला नाही. अत्यंत उपरोधिकपणे प्रा.माधवराव सरकुंडे 'स्वातंत्र्य' या कवितेत लिहितात,

''वृथा बरळत राहिलो स्वातंत्र्य ! स्वातंत्र्य !
ज्या स्वातंत्र्यानं ढुंकूनही पाहीलं नाही आपल्याकडं -
कधी जेवलो की राहीलो उपाशी
भिजलो पावसात की भाजलो उन्हात
काडीएवढा ही बदल झाला नाही आपल्या काडीमोडीच्या संसारात
आहे तिच दगदग आहे पाठीमागे कुत्र्यासारखी
एका एकाला विचारतो मी
कंधी येणार स्वातंत्र्य या दारिद्र्य रेषेखालच्या दुनियेत ?''
(मनोगत, १९९७, पृ.१९)

पुढे ते लिहितात,

''भामरागडातल्या अर्धनग्न माडीया बाचां बघीतल्या की
स्वातंत्र्य म्हणजे अश्लील चेष्टाच वाटते मला ''
(मनोगत, १९९७, पृ.२१)

कृष्णकुमार चांदेकर 'कॅमेरा, 'संस्कृती' यासारख्या कवितेतून आदिवासी लोकांचे जगणे आणि सुधारलेल्या जगाची तुलना करताना अधिक परखड होतात. ते 'कॅमेरा' या कवितेत लिहितात,

'' नागवे होऊन जंगल फिरलो
तेव्हा कॅमेरे आमच्या पाठीशी होते.
आस्मितेचे बंड पुकारले
तेव्हा पोलिस आमच्या पाठीशी होते.''
(पतुसा, १९९९, पृ.२०)

एवढेच नाही तर 'संस्कृती' या कवितेत लिहितात,

''जोशी बाईची मांडी दिसली तर ती अब्रु ठरते
आणि मडावी बाईची मांडी दिसली तर ................
ती संस्कृती ठरते, असे का ?''
(पतुसा, १९९९, पृ.२१)

सुधारणावादी जगाच्या संस्कृतीचे गोडवे गाणाऱ्या जगाचा बुरखा फाडण्याचे कार्यच त्यांची कविता करते.

आदिवासींच्या नावाखाली आमचे परकेपण असेच राहणार असेल तर सुनील कुमरे आपल्या 'राष्ट्रीय प्रवाहात आदिवासी' या कवितेत लिहितात,

''आम्हाला नको आदिवासींचा धर्म
आम्हाला नको आदिवासींची संस्कृती
सदतेशेवटी नको आम्हाला आदिवासी''
(तिरकमठा, १९९९, पृ.३४)

अशी निर्वाणीची भाषा येते. प्रस्थापितांच्या भिकेला तो बळी ठरणार नाही हा आशावाद त्यांच्या 'आदिवासी क्रांती सूर्य' या कवितेत येतो. ते लिहितात,

''अरे ! आदिवासी क्रांतिसूर्य जागला आहे
आपल्या बांधवांच्या वेदना मशाली घेऊन
तो वणवा पेटविणार आहे- अंतस्थ ज्वाळांनी
संस्कृतीची ज्योत जोपासत तुमच्या
पांढरेपक्षा सांस्कृतिक प्रतिष्ठांना भस्म करणार आहे
आदिवासींच्या संस्कृतीचा पाईक बनून

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

समता, बंधूता न्यायाची
अभंग भिंत उभारणार आहे तो !''
(तिरकमठा, १९९९, पृ.२२, २३)

निव्वळ आशावादी राहून चालणार नाही, तर सातत्याने संघर्षासाठी सज्ज रहावे लागणार असल्याचे भानही त्यांची कविता देते. 'विषमतेच्या श्रृंखला' या कवितेत ते लिहितात,

''त्यामुळे सावध होऊन चालावे
असा नियमित इशारा
संघर्ष निर्णायक असल्यामुळे
तिरकमठा सज्ज असावा''
(तिरक मठा, १९९९, पृ. ३२)

आदिवासींच्या विकासाचा वसा घेण्याचा आव आणणारे पुढारीही कुणाच्या तरी दावणीला स्वार्थापोटी बांधले गेलेले आहेत हे वास्तव मांडताना 'गुलाम' या कवितेत वसंत कनाके लिहितात,

''सत्तेसाठी समाजाला विकणारे
मान खाली टाकून
मालकाचे फेकलेले तुकडे चघळून
शोषण कर्त्याच्या दावणीला बसले
गुलामी तोडण्याची भाषा करणारे
स्वतःच गुलाम बनून
हेच समाजाचे पुढारी होवून
खातात समाजाचे राशन''
(सुक्का सुकूम, २००२, पृ. ५०)

राज्यकर्त्या स्वार्थी पुढाऱ्यांवर विसंबून आपला उद्धार नाही. त्यासाठी त्यांचे कावे ओळखून गुलामी नष्ट करण्यासाठी आपणच आपली लढाई लढली पाहिजे असा उपदेश ते येथे सूचित करतात.

एकीकडे प्रस्तपितांविरूद्ध लढा देत असताना अणि आपली अस्मिता जागवित असताना आदिवासी जगतातील उच्च-नीचता जाऊन, एकत्र आल्याखेरीज आपला लढा सक्षम होणार नाही याकडे लक्ष वेधताना वसंत कुलसंगे अधिक अंतर्मुख होताना दिसतात. 'अस्मितादर्श' (२००२) या काव्यसंग्रहात याचा प्रत्यय येतो. 'चेतना', 'आदिवासी', 'संस्कृती', 'जाती जाळा-समाज जोडा', 'प्रबोधन' यासारख्या कविता त्याचेच द्योतक आहेत.

जल, जमीन आणि जंगल यांचा मूळ मालक असलेला आदिवासी समाज आज कसा पोरका झालेला आहे याचे अस्वस्थ करणारे चिंतन तुकाराम हांडे यांच्या 'वळीव' (२००७) या काव्यसंग्रहात आले आहे. 'सर्व्हे', 'सुदारणा', 'सत्ता', 'साहेब', 'श्रावणधारा', 'दुःख', 'खोबण' या कविता त्या दृष्टीने अधिक लक्षवेधी आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून दहा दशके ओलांडूनही आदिवासींना प्राथमिक गरजाही आपले सरकार पुरवू शकत नाही हे वास्तव मांडताना उपरोधिकपणे तुकाराम हांडे 'सर्व्हे' या कवितेत लिहितात,

''प्राथमिक आरोग्य केंद्र निदान गाडीवाट,
रेशन दुकान या गोष्टी त्यांच्याकडे नाहीतच,
त्या लांब तिकडं भारतात कुठंतरी असाव्यात असं म्हणतात.''
(वळीव-एक आकलन, डॉ. संजय लोहकरे, २०१०, पृ. २६)

शासन कोटयावधी रूपये निधी देते पण तो निधी इथली भ्रष्ट व्यवस्था त्याच्यापर्यंत फारसा पोहोचू देत नाही. साहजिकच आदिवासींच्या जगण्याचे प्रश्न तसेच अनुत्तरीत राहतात. भांडवलदार - कारखानदारांचा आदिवासी परिसरावर होत असलेला शिरकाव आणि हजारो एकर जमीन घेऊन आदीवासींचा विस्थापितांचा प्रश्नही हांडे यांना अस्वस्थ करतो. 'भूगोल' या कवितेत ते लिहितात,

''आरं पण एक माणूस असा अर्धा अधिक
भूगोल इकत कसा घेऊ शकतो?
म्हंजे असं कंच्या शास्त्रात लिवलं हाय?
असं करा, सगळया शास्त्रांना एकत्र जमवा
अर्थशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र
सगळी धर्मशास्त्रं, त्याचप्रमाणे आयटी
बायटी, पॉलटेकनीकल
सगळयांनी एकत्र जमून शांत डोक्यानं

नीट बारीक दूरवरचा इचार करा
आणि एवढा भूगोल संभाळा,
आरं बाकीची सगळी शास्त्रं माणसानं
या मातीवर पाय ठेवूनच माणसासाठी तयार केली
ती बिघडली तं सुधरावता येतील
दुसरी शंकर शोधून काढता येतील
पण निसर्गानं सजीवांसाठी बनवलेला भूगोल बिघडलाना
बाबानों इठं माणूसच शिल्लक राहणार नाही.''
(वळीव - एक आकलन, डॉ. संजय लोहकरे पृ. २८, २९)

असा अगदीच निर्वाणीचा इशारा हांडे देतात. भ्रष्ट राजकरणावरही ते कडाडून हल्ला करतात.

आदिवासी हे मूळ निवासी. या भूमिपुत्रांनाच जल, जंगल आणि जमिनीसाठी प्रस्थापितांविरूद्ध लढा द्यावा लागावा ही फार मोठी शोकांतिका असल्याचे प्रतिपादन डॉ. संजय लोहकरे यांची कविता करते. आदिवांसीच्या जगण्याची परवडही त्यांची कविता अधोरेखित करते. 'मजुरी', 'काडा', 'रानपन', 'सपान', 'देव म्हतारी', 'उतरंड', 'जन्मठेप', 'कुड', 'पानझडी', 'टेंभूर्णी', 'भारा', 'तहान', 'पारध' अशा अनेक कविता त्याचे निदर्शक आहेत.

**समारोप**

आदिवासी लोकांनी एके काळी या देशात राज्य केले. गोंड, भिल्ल, महादेव कोळी या पूर्वी राज्यकर्त्या जमाती होत्या. अनेक राजे-रजवाडे, क्रांतिकारी स्त्रिया होऊन गेल्या. त्यांनाच आज गुलामीचे, तुच्छतेचे जगणे जगावे लागत आहे. पूर्वीच्या शूरांची कारकीर्द आठवित, अस्मिता जागवित, अत्याचाराविरूद्ध पेटून उठण्याची गरज मांडत प्रस्थापितांविरूद्धचा लढा अधिक तीव्र करीत, त्यात सातत्य ठेवण्याची गरज आदिवासींची कविता मांडते. त्यांच्या या कविता समाज, धर्म, संस्कृती आणि आदर्शांचे अधिष्ठान आहे. आपल्या जगण्याची परवड मांडत असताना आपले रडगाणे गाण्यात ही कविता सार्थक मानत नाही, तर इथल्या भ्रष्ट व्यवस्थेचे आपण बळी ठरत आहोत याचे भान त्यांची कविता देते. त्यामुळेच विविध अंगांनी आणि विवि दिशांनी ही कविता आज विकासत आहे. विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेला धक्के देत मानवी जीवनमूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी समतेचा उद्घोष करीत आहे हे निश्चित.

*****